मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.

फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.

Email: ccfthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

ISO 9001:2008 Certified by IRQS

विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत
मौजे वर्सोवा, जुहू व बांद्रा (दांडे) येथील वर्सोवा-बांद्रा सी-लींक करीता 2.9907 हेक्टर कांदळवन/वनजमिन मागणी प्रस्ताव.

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.22/20-21/जा.क्र. 313 /2020-21
ठाणे - 400 603, दिनांक - 21/12/2020

वाचा:-

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17/ एनसी/II/आयडी-12647/(66)/1763, दि.14.12.2018
2) केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर कडील पत्र क्र.एफसी-I/एमएच-136/2018-एनजीपी/4699, दि.20.12.2018
3) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई कडील पत्र क्र.कक्ष-3/जमिन/715, दिनांक 09.10.2020.
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17/ एनसी/II/आयडी-12654/(66)/672, दि.26.10.2020.
5) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई कडील पत्र क्र.कक्ष-3/जमिन/1035, दिनांक 03.12.2020
6) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई कडील पत्र क्र.कक्ष-3/जमिन/1126, दिनांक 18.12.2020
7) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि.08.08.2014.
8) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि.15.01.2015.
9) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014, दि.07.05.2015.
10) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दिनांक 01.07.2015.
11) मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) मुंबई यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-1116/प्र.क्र.270/फ-10, दिनांक 20.07.2017
12) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई कडील पत्र क्र.कक्ष-9/जमिन/888, दिनांक 10.11.2020.

<u>आदेश -</u>

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, बांद्रा (पश्चिम), मुंबई 400050 यांचेकडून प्राप्त झालेला मौजे वर्सोवा, जुहू व बांद्रा (दांडे) येथील वर्सोवा-बांद्रा सी-लींक करीता 2.9907 हेक्टर कांदळवन/ वन जमिन मागणी प्रस्ताव उपरोक्त अ.क्र.१ अन्वये केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचेकडे सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, बांद्रा (पश्चिम), मुंबई यांचेकडील प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 2.9907 हेक्टर क्षेत्र वळते करण्याची केंद्रशासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अटी / शर्तीनुसार विविध प्रयोजनासाठी जसे वनाचे प्रत्याशी मुल्य (Net Present Value), पर्यायी वनीकरण (CA) इ. करीता कांदळवन कक्षाकडुन परीगणीत केलेली रक्कम प्रकल्प प्राधिकरणाने कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेली आहे दिसुन येते.

आणि ज्याअर्थी, सदर प्रकल्पांतर्गत कांदळवन क्षेत्राचा समावेश असल्यामुळे, मा. उच्च न्यायालय मुंबई, जनहित याचिका क्र.87/2006 च्या अनुषंगाने प्रकल्प प्राधिकरणाकडुन मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.535/2019 मध्ये मा.न्यायालयाने दि.08.02.2019 रोजी निर्णय पारीत केलेला होता. प्रकरणी Zoru Darayus Bhathena यांनी मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल स्पेशल लिव्ह पिटीशन (Civil) डायरी क्र.8449/2019 मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.01.04.2019 रोजी आदेश पारीत केलेले आहेत. या प्रकरणात Zoru Darayus Bhathena यांचेकडुन मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल नोटिस ऑफ मोशन क्र.190/2019 मध्ये दि.16.12.2020 रोजी पारीत केलेले आदेश प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले आहेत. सदर आदेशामध्ये श्री. Zoru Darayus Bhathena यांनी दाखल केलेली नोटीस ऑफ मोशन Withdrawl संदर्भात आदेश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या आदेश पुढील प्रमाणे आहेत.

"Para 1 - The Prayers made in this notice of motion, which was filed on 2nd May 2019 availing the leave granted by the Supreme Court by its order dated 1st April, 2019, do not survive in view of the letter dated 28th January 2020 issued by the Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India Department modifying the earlier permission granted by letter dated 9th January 2013. Confronted with such a situation, Ms. Bhattacharaya, learned Advocate for the applicant seeks withdrawal of this notice of motion with liberty to institute appropriate proceedings in accordance with law".

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.एफ/नं.11-84/2011-IA-III दि.09.01.2013 अन्वये प्रकल्प प्राधिकरणास 1 ते 19 अटी शर्तींच्या अधीन राहुन CRZ मान्यते बाबत शिफारस केली आहे. तद्नंतर Expert Appraisal Committee यांचेकडील दिनांक 24.09.2019, च्या 224 व्या बैठकीच्या इतिवृत्तात CRZ शिफारसी मध्ये दुरुस्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, अ.क्र.1 अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.2 अन्वये काही अटीं शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तीचा पूर्तता अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी संदर्भ क्र.3 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर केलेला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने अ.क्र.4 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांनी 1 ते 7 मुदयांवर मागविलेली माहिती, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन मुंबई यांनी उपरोक्त अनुक्रमांक 5 अन्वये त्यांचेकडे सादर केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांनी उपरोक्त अ.क्र. 6 अन्वये मा.उच्च न्यायालयाचे दि.16.12.2020 रोजीच्या आदेश पाठवुन Working Permission बाबत पुढील कार्यवाहीसाठी कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र. 7 व 8 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.9 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाने वरील अ.क्र. 10 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, कांदळवन कक्षाकडील अशा प्रकरणात आवश्यक अटींची पूर्तता होत असल्यास प्रकल्प यंत्रणेस कामे सुरु करण्यास व झाडे तोडण्याची परवानगी देणेस हरकत नसल्याबाबत अन्य प्रकरणात राज्यशासनाने वरील अ.क्र.11 अन्वये कळविले आहे.

आणि त्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तीची पूर्तता प्रकल्प प्राधिकरणाकडून झालेली असणे तसेच मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक 16.12.2020 रोजी पारित झालेल्या निर्णयास अनुसरुन, 2.9907 हेक्टर क्षेत्रात कामे सुरु करण्यासाठी व वृक्ष तोडीसाठी परवानगी (Working Permission) देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, बांद्रा (पश्चिम), मुंबई यांना कांदळवन वृक्षतोडीकामी मा. उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश, CRZ मान्यता पत्रातील अटी / शर्ती, आणि केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्ती तसेच खालील नमूद केलेल्या अटी / शर्तीच्या अधिन राहून मौजे वर्सोवा, जुहू व बांद्रा (दांडे) येथील

वर्सोवा-बांद्रा सी-लींक करीता 2.9907 हेक्टर कांदळवन/ वन जमिन मागणी प्रस्ताव क्षेत्रामध्ये कामे सुरु करण्यास वृक्ष तोडीसाठी परवानगी (Working Permission) देत आहे.

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत कांदळवन/वनक्षेत्रातील क्षेत्रातील वृक्षतोड आणि प्रस्तावित कामे करण्यापुरती मर्यादित आहे.

2) केंद्र शासनाचे पर्यावरण, वन मंत्रालय, नवी दिल्ली कडून प्राप्त CRZ मान्यता पत्रातील अटी / शर्ती प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

3) मा. उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन क्र.535/2019 मध्ये दिनांक 08.02.2019 रोजीचे आदेश, मा.सर्वोच्य न्यायालयातील स्पेशल लिव्ह पिटीशन क्र.8449/2019 मध्ये दि.01.04.2019 रोजी पारित केलेले आदेश आणि मा.उच्च न्यायालयात दाखल नोटीस ऑफ मोशन क्र.190/2019 मध्ये दि.16.12.2020 रोजी पारीत केलेला निर्णय या सर्व निर्णय/आदेशातील बाबी प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

4) सदर प्रकल्पास केंद्रशासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून वनजमिन वळतेकरण आदेश अप्राप्त आहे. तत्वत: / विधीवत मान्यता मिळालेल्या दिनांका पासून 6 महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची संबंधित विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल सादर करतील.

5) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत कांदळवन क्षेत्रात कामे सुरु करण्यापूर्वी, सबंधित विभागीय वन अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे. संबंधित विभागीय वन अधिकारी यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित क्षेत्रात वनभंग झाला आहे का ते पाहणे. तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

6) प्रकल्प यंत्रणेकडून कांदळवन क्षेत्रात कामे करतांना कमीत कमी हानी पोहोचेल ही बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

7) प्रकल्पांतर्गत क्षेत्रात कामे करताना नैसर्गिक पाण्याचे मार्ग नदी, नाले, पाण्याचे प्रवाह बंद होणार नाहीत. तसेच वन्यप्राणी यांचे जाण्या-येण्याचे मार्ग बंद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

8) प्रकल्पांतर्गत जागेवर कांदळवन पुर्नस्थापना (Restoration Plan) ची अंमलबजावणी करण्याकरीता कांदळवन कक्षाने आराखडा प्रस्तावित केल्यास सदर आराखड्याचे मूल्य प्रकल्प यंत्रणा भरण्यास तयार असेल.

9) सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून औपचारिक वनक्षेत्र वळते करण्याचे आदेश अप्राप्त आहेत. सदर आदेश / मान्यता देताना घालून दिलेल्या अटीं / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

10) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी वनहक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जारी केलेले आहे. तरी देखील प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉटधारक, भूमीहिनांना वाटप प्लॉटधारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

11) पर्यावरण व वनमंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळोवेळी घातलेल्या व घालण्यात येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

12) प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

13) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्रशासनाचे पर्यावरण,वन व जलवाह मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील Hand book मधील परिच्छेद क्रं. 1.21 अनुसार निर्विर्दीष्ट कार्यवाही करावी.

<u>अनुसुची</u>

| गावांचे नांव | तालुका | सर्व्हे नंबर/ CTS No. | वैधानिक दर्जा | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| वर्सोवा | अंधेरी | PR No.1276 | राखीव वन | 0.1413 |
| जुहू | अंधेरी | 1217 (नवीन कांदळवन) | कांदळवन/अधिसुचीत वन | 2.1250 |
| जुहू (कोळीवाडा) | अंधेरी | PR No.1213P | कांदळवन | 0.5008 |
| जुहू (कोळीवाडा) | अंधेरी | PR No.962P | कांदळवन/Mud Flat | 0.1165 |
| बांद्रा (दांडे) | अंधेरी | C/1662(नवीन कांदळवन) | राखीव वन | 0.1071 |
| | एकूण एकंदर | | | 2.9907 |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर. सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

(नरेश झुरमुरे)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.

प्रती,

विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन (संधारण) घटक, मुंबई.

प्रतिलिपी :- प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांजकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :-कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., बांद्रा, मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

2.00 निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत विभागीय वनअधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई आणि संबंधित विभागास यांना देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-11 (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

sd/xxx
(नरेश झुरमुरे)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.